**पुणे महानगरपालिका**
**महिला व बाल कल्याण समिती**
**कार्यपत्रिका क्र. १५**

**महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक २४/१०/२०१८ रोजी दुपारी ३.३० (साडे तीन) वाजता महात्मा ज्योतिबा फुले सभागृह (स्थायी समिती सभागृहात) भरेल.**

**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ८३**

**मा.सुनिल कांबळे व मा.मारुती तुपे यांचे दिनांक ९/१०/२०१८ चे पत्र.**

आमचे प्रभाग क्र.२३ड मध्ये सर्वे न.३९,प्रगतीनगर,काळे बोराटे नगर, हडपसर येथील सार्वजनिक शौचालय मागील ६ वर्षांपासून विनावापर व बंद आहे. सदरील वापरत नसलेल्या शौचालयाचे इमारतीत गैरप्रकार, व्यसनांचे प्रकार राजरोसपणे चालतात व यामुळे सदर इमारतीचे विद्रुपिकरण झाले आहे. सदरील बांधकाम अतिशय चांगल्या अवस्थेत असून या बांधकामचे अंतर्गत नुतनीकरण करुन परिसरातील शालेय विद्यार्थी,ज्येष्ठ नागरिक इतरांसाठी वाचनालय बांधता येईल . सदरील अंतर्गत दुरुस्ती व इतर तदनुषंगीक कामांसाठी माझ्या स्थानिक निधीतून र.रु २० लक्ष तरतुद केलेली आहे.

सदर शौचालयातील इमारतीत अंतर्गत दुरुस्त्या करुन वाचनालय केल्यास पुणे मनपाचे शौचालायचे इमारतीकरीता खर्च केलेल्या पैशांचा योग्यच वापर होईल.

**विषय क्र. ८४**

**मा. विशाल गोरख धनवडे व मा.सौ. प्राची आल्हाट यांचे दिनांक १२ /१०/२०१८ चे पत्र.**

पुणे महानगरपालिकेच्या रुगणालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम बै.जी. वैद्यकिय महाविद्यालयास संलग्नित सुरु करणे बाबत.

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य खात्यामध्ये सेंकडरी केअर युनीट म्हणून कमला नेहरु रुग्णालय, सोनवणे रुग्णालय व नायडू रुग्णालय या ठिकाणी पुणे शहारातील रुग्णांवर उपचार करण्यात येतात. महानगरपालिकेच्या दवाखान्यातुन आणी रुग्णालयामधुन अल्प गटातील गरीब नागरीक उपचार घेत असतात. ब–याच वेळा रुग्णांना तज्ञ डॉक्टारांच्या सल्ल्याची गरज असते. तथापी तज्ञ डॉक्टारांच्या सल्ल्याकरीता खर्च करण्याची अशा रुग्णांची परिस्थिती नसते. त्यामुळे मनपा रुग्णालय दवाखान्यात येणारे रुग्ण तज्ञ डॉक्टारांच्या सल्ला न मिळाल्याने योग्य त्या उपचारापासून वंचित होतात. योग्य आणि प्रभावी सेवा मिळणे हा सर्वच नागरीकांचा हक्क आहे म्हणुन मनपा दवाखाने व रुगणालयात येणा–या गरीब व गरजु रुग्णांना जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे वैद्यकिय सेवा उपलब्ध होण्यासाठी कमला नेहरु रुग्णालय,सोनवणे रुग्णालय व नायडू रुग्णालय या ठिकाणी भारतीय आर्युविज्ञान परिषदेच्या मानकानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन क्ष–किरण शास्त्र, शल्य चिकित्सा शास्त्र,बधिरीकरण,कान नाक घसा,नेत्र शल्य चिकित्सा, औषधवैद्यक,

स्त्रीरोग व प्रसुती शास्त्र, अस्थिव्यंगोचार व बालरोग चिकिस्ता विभागांचे पदव्युत्तर अभ्यासक्रन सुरु करणेकरीता वैद्यकिय महाविद्यालय संलग्नित सुरु करावे.

**<u>विषय क्र. ८५</u>**

**<u>मा.सौ. रुपाली धाडवे यांचे दिनांक १५/१०/२०१८ चे पत्र</u>**.

संपूर्ण पुणे शहरामध्ये अंदाजे २२ ते २५ हजार तृतिय पंथी नागरिक राहत आहेत. या नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये सामान्य नागरिकांप्रमाणे रोजगारोच स्त्रोत उपलब्ध होत नाही. यामुळे अनेक तृतिय पंथींना त्यांचा उदरनिर्वह करणेकरिता भिक्षा मागितल्या शिवाय पर्याय उपलब्ध नाही. याच अनुषंगाने पुणे शहरातील तृतिय पंथींना पुणे महानगरपालिकेच्या वतीने अर्थसहाय्य योजना सुरु करणे अत्यंत गरजेचे आहे.

तरी पुणे महानगरपालिकेच्या वतीने विविध घटकांतील नागरिकांकरिता विविध योजना राबविता येतात .यामध्ये विधवा, अपंग,विद्यार्थी इ.घटकांकरिता आर्थिक सहाय्य ,आरोग्य सुविधा इ. बाबी पुरविल्या जातात . त्याप्रमाणे पुणे महानगरपालिके मार्फत तृतिय पंथींकरिता एक रक्कमी आर्थिक सहाय्य अथवा प्रति महिना अनुदान रुपी आर्थिक योजना सुरु करण्यात यावी. तसेच पुणे महानगरपालिकेच्या शहरी गरीब वैद्यकीय योजनेचा देखील त्यांस लाभ देण्यात यावा .

**<u>विषय क्र. ८६</u>**

**<u>मा.सौ.राजश्री नवले, अध्यक्षा,महिला व बालकल्याण समिती व मा.सौ. रुपाली धाडवे यांचे दिनांक २०/१०/२०१८ चे पत्र</u>**.

पुणे महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये शाररिक शिक्षणाचे वर्ग (पी.टी.) अभ्यासक्रमाचा तास घेतले जातात. सध्या लहान वयातील मुले हे मोबाईलच्या अतिरिक्त आहारी गेल्यामुळे या मुलांचे स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. या विद्यार्थ्यांना आरोग्य तंदरुस्तीची माहिती व त्याकरिता आवश्यक व्यायामाची मिळावी म्हणून सर्व मनपा शाळेमध्ये योगा प्रशिक्षण शिकविणे आवश्यक वाटते . मनपा शाळेमध्ये शाररिक शिक्षण हा महत्वाचा विषय देखील शिकविला जात असतो.

तरी पुणे महानगरपालिकेच्या सकाळ सत्रातील तसेच दुपार सत्रातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये शाररिक शिक्षणाचे वर्ग ( योगा प्रशिक्षण ) मिळणेसाठी शाळेच्या मैदानावर दररोज पहिला तास योगा अभ्यासक्रम शिकविण्यात यावेत .

**<u>खात्याकडील प्रस्ताव</u>**

**<u>विषय क्र. ८७</u>**

नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेतंर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता लोकप्रतिनिधी मार्फत प्रस्तावित करणेत आलेल्या र.रु.३५ लक्ष पर्यंतची कामे करणेस मा.महिला व बालकल्याण समिती, पुणे मनपा यांची मान्यता मिळणेबाबत.मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. मआ/ स.क /५६३, दि. ८/१०/२०१८ चे पत्र.

**<u>विषय क्र. ८८</u>**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेतंर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता लोकप्रतिनिधी मार्फत प्रस्तावित करणेत आलेली र.रु.२० लक्ष पर्यंतची कामे

करणेस मा.महिला बाल कल्याण समिती पुणे मनपा यांची मान्यता मिळणेबाबत.मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा. क्र.मआ/ स.क / ५६७ , दि. ८/१०/ २०१८ चे पत्र.

**<u>विषय क्र. ८९</u>**

नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेतंर्गत सन २०१८–१९ या आर्थिक वर्षाकरिता लोक– प्रतिनिधी मार्फत प्रस्तावित करणेत आलेली र.रु.२० लक्ष पर्यंतची कामे करणेस मा.महिला व बाल कल्याण समिती;पुणे मनपा यांची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. मआ/स.क./ ५६९, दि. ८/१०/२०१८ चे पत्र.

**<u>विषय क्र. ९०</u>**

नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेतंर्गत सन २०१८–१९ या आर्थिक वर्षाकरिता लोकप्रतिनिधी मार्फत प्रस्तावित करणेत आलेली र.रु.२५ लक्ष पर्यंतची कामे करणेस मा.महिला व बालकल्याण समिती,पुणे मनपा यांची मान्यता मिळणेबाबत.मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. मआ/ स.क /५७६, दि. ८/१०/२०१८चे पत्र

**<u>विषय क्र. ९१</u>**

लोकशाहीर अण्णाभाऊसाठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेतंर्गत सन २०१८–१९ या आर्थिक वर्षाकरिता लोकप्रतिनिधी मार्फत प्रस्तावित करणेत आलेली र.रु.६० लक्ष पर्यंतची कामे करणेस मा.महिला व बालकल्याण समिती, पुणे मनपा यांची मान्यता मिळणेबाबत.मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा. क्र.मआ/स.क/५९६,दि.१५/१०/२०१८ चे पत्र .

**<u>विषय क्र. ९२</u>**

नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेतंर्गत सन २०१७–१८ या आर्थिक वर्षाकरिता लोकप्रतिनिधी मार्फत प्रस्तावित करणेत आलेली र.रु.१० लक्ष पर्यंतची कामे करणेस मा.महिला व बालकल्याण समिती, पुणे मनपा यांची मान्यता मिळणेबाबत.मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/ स.क/६१०,दि. १६/१०/२०१८चे पत्र .

**<u>मागील सभेचे विषय</u>**

**<u>विषय क्र. ९३</u>**

नागरी दलितवस्ती सुधारणा योजनेतंर्गत सन २०१४–१५ मधील प्रभाग क.६१ इंदिरा वसाहत येथे कॉंक्रीट रस्ता करणे व प्रभाग क्र.६१ इंदिरा वसाहत येथे ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रीट करणे ही कामे रद्द करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महापलिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. मआ/ समाज कल्याण / ४९४,दि. /१४/२०१८ चे पत्र.

**<u>(टिप:–विषय क्र.९३ चा विचार पुढील सभेत करावा असे दि.२६/९/२०१८ सभेत ठरले)</u>**

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**